# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 04/08/2023 (शुक्रवार) सकाळ


### देवलापार पोलीसांनी अवैध गोवंश वाहतुक करणाऱ्या ट्रक वाहन चालकास पकडून १९ गोवंश यांना दिले जिवनदान

पो.स्टे. देवलापार :— अंतर्गत ०.५ कि. मी. अंतरावरील मौजा देवलापार ते रामटेक रोड येथे दिनांक ०२/०८/२०२३ चे २२.३० वा. ते २३.३० वा. दरम्यान देवलापार पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, एक इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन देवलापार पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन आरोपी १० ट्रक चक्का चालक गाडी क्र. एम. एच.— ४०/ ए.—६१४७ चा चालक फरार आरोपी याने आपल्या ताब्यातील १० चक्का ट्रक हा बेदरकारपणे लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा पध्दतीने चालवुन ट्रकमध्ये १९ गोवंश जनावरे अत्यंत क्रुर व निर्दयतेने वाहनात डांबुन आखुड दोरीने पाय व तोंड बांधून अपुऱ्या जागेत कोंबुन नेत असल्याने मुखबीरच्या माहीती वरून पोलीस स्टेशन देवलापार येथे नाकाबंदी लावण्यात आली व नाकाबंदी दरम्यान सदर १० चक्का ट्रकचालक गाडी क्र. एम. एच.— ४०/ए.—६१४७ चा चालकाने आपले वाहन न थांबवता डिवायडरला जाऊन धडक दिली व ट्रक चालकने ट्रक साईडला थांबुन पळुन गेला. सदर ट्रक क्र. एम.एच.— ४० ए.—६१४७ मधुन १९ जिवंत गोंवश जनावरे एकुण किंमती १,९०,०००/— रू. १० चक्का ट्रक चालक गाडी क्र. एम. एच.— ४० ए. —६१४७ किंमती अंदाजे १५,००,०००/— रू असा एकुण १६,९०,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे पोशी सचिन भगवान येळकर, पो.स्टे. देवलापार यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम २७९, ४२७ भा.द.वि सहकलम ११(१), ११ (१), (ळ), ११ (१), (D), ११ (१), (C), प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम सहकलम ५ अ, ९ महाराष्ट्र प्राणि संरक्षण अधिनियम सहकलम ११९ मपोका. सहकलम १८४, १३४, ४, १२२, १७७, मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शरद गायकवाड पो.स्टे. देवलापार मो. क्र. ९९२३९८८२९२ हे करीत आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर